आभा आदित्य शिरीष दीक्षा सुजाता अनुपम सगळे गप्पांच्या रंगात आले होते. अगदी भन्नाट मूड मध्ये होते सगळे जण. आभा आणि आदित्य चं नुकतच लग्न ठरलं होतं. अगदी रीतसर पाहून ठरले होतं. सगळे जण त्या दोघांची चेष्टा मस्करी करत होते. हनीमूनला कुठे जायचं, कोणत डेस्टिनेशन प्युअरली हनिमून डेस्टिनेशन आहे, याबद्दल प्रत्येक जण आपापली मते सांगत होता. कुणी म्हणत होतं मोरीशस तर कुणी सांगत होतं केरळ ला जा. कुणी सांगत होतं अरे हनिमूनला कधी साईट सीइंग च्या ठिकाणी जायच नसतं, सगळा वेळ काय त्यात घालवायचा? अशा सगळ्यांच्या गमती जमती चालल्या होत्या. मग जॉब त्यातल्या जबाबदाऱ्या सध्याची पे स्केल्स या विषयांवर गप्पांची गाडी आली. आभा आदित्यला तिच्या होणाऱ्या नवऱ्याला म्हणाली, " ए तू सांग न कोणत्या कॉलेज मधून बी..ई केलस?" सगळे जण खो खो हसायला लागले. " ए , आदित्य आणि बी.ई ? कुणी सांगितलं हा बी ई आहे म्हणून? ए आदित्य कुणी दिली तुला इंजीनिअरिंग ची डिग्री ? असं कोणत कॉलेज आहे तुला डिग्री द्यायला ? " सगळे जण आदित्याची टिंगल करत होते. आभा बुचकळ्यात पडली.

" म्हणजे तू बी ई नाहीस? मग तू मला खोटं का सांगितलस ? " आभा तडक त्या गोतावळ्यातून बाहेर पडली. तिचे डोळे नकळत पणे झरत होते, तिला काहीच समजत नव्हतं. आपण फसवले गेलो हे तिला कळून चुकल. ती तशीच तडक घरी निघून आली. तिला लवकर आलेलं पाहून आईला आश्चर्य वाटलं. पण तिचे लाल झालेलं डोळे पाहून आईच्या लक्षात आलं की काहीतरी बिनसलंय.

"काय ग काय झालं "–

"आई आदित्य बी ई. नाहीये. तो साधा डिप्लोमा होल्डर आहे. त्यातले सुद्धा १/२ पेपर राहिले आहेत म्हणे. त्यांनी आपल्याला फसवलंय. आपण त्यांना त्याचं शिक्षण विचारल आणि त्यांनी नुसतच सांगितलं की तो इंजिनिअर आहे म्हणून पण आपण त्याची डिग्री नाही विचारली आणि त्यांनीही ती नाही सांगितली. आई मला हे लग्न नाही करायचं. त्याचं शिक्षण कमी आहे म्हणून नाही तर त्यानं मला फसवलंय. "

---

अरेंज्ड मरेज च्या संदर्भात माहितीची खातरजमा करणे हा आज अनेकांच्या चिंतेचा विषय आहे. अनेक जण मला विचारतात की माहितीची विश्वासार्हता कशी तपासून पाहायची? त्यांनी दिलेली माहिती खरी कशावरून ? अनेकदा जर श्रीमंत स्थळ असेल तर त्यांच्या नावावर भुलून लग्न केलं जातं आणि लग्नानंतर बड्या घराचा पोकळ वासा नजरेला पडतो. वरच्या उदाहरणात देखील आदित्य चे वडील एका मोठ्या कंपनीत मोठ्या हुद्द्यावर काम करणारे होते. आणि आई सुद्धा चांगली शिकलेली होती. ही पार्श्वभूमी लक्षात घेऊन आदित्य च्या शिक्षणासंदर्भात कुणीच जास्त चौकशी केली नाही.

लग्नाच्या संदर्भात जे आहे ते वाढवून सांगण्याची सवय अनेकांना असलेली दिसते. मुलगी पाच अडीच उंचीची असेल तर आई वडील सर्रास तिची उंची पाच तीन सांगतात. मुलीचा वर्ण एक पायरी पुढे

सांगायची प्रथा तर आपल्या हाडी मासी मुरलेली जाणवते. मुलगी काळी असेल तर सावळी, सावळी असेल तर उजळ रंगाची, उजळ असेल तर गोरी असे अनेक जण अगदी छातीठोक पणे सागत असतात. आपला भारत देश स्वतंत्र होऊन इतकी वर्षे झाली तरी इंग्रजांच्या गोरेपणाबाबतची दीपलेपणा ची भावना आपल्या मनातून काही गेलेली नाही. आणि लग्नाच्या बाबत तर गोरेपण हा एक महत्वाचा निकष मानला जातोय. अजूनही अपेक्षा ठरवताना भावी जोडीदार गोरा हवा ही अट असलेली दिसते.

वधू वर यांच्या स्वतःच्या बाबतीत किंवा घरातल्या अनेक गोष्टी सांगितल्या जात नाहीत. या बाबतीत सगळ्यांच्या मनात शंका निर्माण झालेल्या दिसतात.

अरुंधती आणि अद्वैत दोघेजण दोन वेळा बाहेर भेटले एकमेकांना. विविध विषयांवर त्यांनी गप्पा मारल्या. दोघांनाही जाणवत होतं की ह्या भेटींच रूपांतर नात्यात होऊ शकेल . त्याच संध्याकाळी अरुंधतीचा मला फोन आला. अरुंधतीला एक लहान भाऊ होता आणि तो काही प्रमाणात गतीमंद होता. पण ही गोष्ट ना त्यांनी माहितीच्या फॉर्म मध्ये दिली होती ना तिने त्याला भेटल्यावर सांगितली होती. पण आता मात्र अरुंधतीला चैन पडत नव्हतं. एका बाजूला हे कळल्यावर अद्वैत नकार देईल ही भीती वाटत होती आणि एका बाजूला न सांगितल्याची रुखरुख. मला म्हणाली “ काय करू. न सांगता तर मला पुढे जायच नाही. पण तो आता म्हणू शकतो की आधी का नाही सांगितलस? मला खूप भीती वाटते आहे. “

मी म्हटलं “ हो भीती वाटणं स्वाभाविक आहे, पण त्याला दुसरा पर्याय नाही. खरं तर याआधीच हे सांगणं अपेक्षित होतं, पण निदान आता तरी ही गोष्ट ताबडतोब सांगायला हवी. “

परदेशातल्या मुलांच्या बाबतीत हा प्रश्न अनेकांच्या मनात येतो. त्याच्या/ तिच्या सवयी काय असतील? फॉर्म मध्ये लिहिलेला पगार बरोबर असेल ना? त्यापेक्षा कमी तर नसेल ना? त्याचं/ तिच वागणं कसं असेल? बाहेर काही अफेअर तर नसेल ना? एक ना दोन -- असंख्य प्रश्न मनात.

राजश्री चे वडील आले होते. मुंबईच्या एका मुलाच स्थळ कळल होतं, त्यांच्या मुलीसाठी -राजश्री साठी. पण त्यांना चिंता पडली होती की त्याची माहिती कशी काढायची. मला म्हणाले ,”अशी एखादी यंत्रणा तुमच्या कडे नाही का, त्याची पूर्ण माहिती मिळावी.”

मी म्हटलं,” तुम्हाला काय काय माहिती हवी त्याची? “

तर म्हणाले,” की तो वागायला कसा आहे? त्याच्या मित्रांमध्ये/ मैत्रिणींमध्ये तो कसा वागतो ? तो ड्रिंक्स किती घेतो ? किती वेळा घेतो? त्याचं ब्रान्ड काय आहे? स्मोकिंग करतो का? त्याचं चारित्र्य कसं आहे? तो समजून घेतो का? ऑफिस मध्ये त्याचं पटत का सगळ्यांशी? अशा अनेक

गोष्टींचा विचार करायला लागलं की झोप उडते हो माझी. कशी फुलासारखी वाढवली आहे मी माझ्या मुलीला. बर ह्या मुलाची कुठूनही ओळख सुद्धा निघत नाहीये. मी बराच प्रयत्न केला. शिवाय त्याच्या घराची माणसं कशी आहेत ? माझ्या मुलीला काही त्रास तर नाही ना होणार?"

" अहो अशा पद्धतीची सगळी माहिती काढायची म्हणजे डिटेक्टीव एजन्सी ची मदत घ्यावी लागेल. आणि तरी सुद्धा चारित्र्य वगैरे समजण हे खरंच खूप अवघड आहे. आणि अशा प्रकारे विचार करत गेलो तर गुंता वाढत जाईल. कारण माणूस असा  कळतो का हो? लग्नाला वीस वीस वर्ष झाली तरी अनेकांना आपला जोडीदार नेमका  कसा  आहे ते लक्षात येत नाही. त्यापेक्षा प्रत्यक्ष त्याच्या आई वडिलांना भेटाव, निरनिराळ्या विषयांवर गप्पा माराव्या ,त्यांच्या घरातल्या रिती भाती, पद्धती  जाणून घ्याव्या. त्यातून त्या घराची संस्कृती  समजत जाईल. इतर कुठल्या लोकांकडे केलेल्या चौकशी पेक्षा सुद्धा आपण प्रत्यक्ष बोलून जाणून घेणे हे जास्त संयुक्तिक ठरेल असे वाटते मला.

अनेक जण तो मुलगा / मुलगी जिथे काम करतात तिथे फोन करून किंवा प्रत्यक्ष जाऊन चौकशी करतात. अशा वेळी त्या मुलाला / मुलीला ऑकवर्ड वाटू शकतं.

पायल एका शाळेत काम करीत होती. एक दिवस रजा घेण्यावरून तिची आणि त्या शाळेतल्या हेड क्लार्क ची वादावादी झाली होती. पायल च्या लाग्नाचेही तिचे आईबाबा बघत होते. रवी नावाच्या एका मुलाचे स्थळ तिला सांगून आले होते. त्यांच्या घरी त्यांची पहिली भेटही झाली होती. रवीचे बाबा तिची माहिती काढायला थेट शाळेत पोचले. नेमकी तिची चौकशी त्यांनी त्या हेडक्लार्क जवळ केली. तो म्हणाला, " अहो एक नंबरची भांडकुदळ आहे ती. "

अनेकदा एकाला एख्द्याच्या  बाबतीत आलेला  अनुभव दुसर्याला तसाच येईल असं नाही. याचा तारतम्याने  विचार करायची गरज आहे. आणि इतर अनेक ठिकाणी चौकशी करण्यापेक्षा आपणच थेटपणे भेटणे बोलणे चांगले, हो ना? तुम्हाला काय वाटते?